# ॥ अध्याय तेरावा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीमद्दत्तात्रेयस्वामिने नमः ॥ ॥ शिष्य वदे हो सद्गुरुनाथा । परम पवित्र दत्तात्रेय-कथा । त्रैलोक्यपावनी महत्प्रथा । परोपकारार्थ निरूपा जी ॥ १ ॥ धन्य कमंडलुतीर्थ भूवरी । जेथें प्रतिष्ठित असे दत्तगिरिनारी । दीननतजनवत्सल त्रिपुरारि । विश्वविहारी भूतात्मा ॥ २ ॥ नित्य तत्पर परोपकारी । योगीश्वराधीश स्वेच्छाचारी । करुणार्णव त्रिभुवनसंचारी । दत्तात्रेय जगद्गुरु ॥३॥ प्रल्हाद आणि अलर्कराजासी । यदुराजादि कार्तवीर्यासी । ब्रह्मविद्या बोधूनि जनांसी । दत्तात्रेयें कृतार्थ केलें ॥ ४ ॥ मत्स्येंद्र-गोरक्षादिक सारे । योगानंदपदासी साधिकारें । श्रीमद्दत्तात्रेयगुरुकृपावरें । पावले अखंडात्मस्वरूप ॥ ५ ॥ जो भक्तजनकार्यकल्पद्रुम । कमंडलुतीर्थीं पुरुषोत्तम । भक्तप्रतिज्ञासिद्ध्यर्थ पूर्णकाम । आत्माराम उभा असे ॥ ६ ॥ ती कथा करावया श्रवण । उदित झालें माझें अंतःकरण । ज्या गुरुलीलामृतप्राशनें जरामरण- । रहित होती सकलही ॥ ७॥ प्रेमभरें गुरु शिष्यासी वदती । तेचि कथा सादर चित्तीं । ऐक बापा शिष्या सुमति । धन्य परमार्थी अधिकारी ॥ ८ ॥ तुजकरितां आम्हांसी । परमलाभही जगतासी । जसें दुग्ध सर्वत्र उपयोगासी । वत्सानिमित्तें येतसे ॥ ९ ॥ चंचलभारतीची प्रतिज्ञा । दत्तात्रेयदर्शनें शुद्धप्रज्ञा । त्या वाचाल साधुवृंदा अनभिज्ञां । सहज पूर्ण जाहली ॥ १० ॥ कलियुगामाजीं दत्तदर्शन । जे योगयागादि तपानुष्ठान । करिताति यथाविधान । तयांहि अत्यंत दुर्लभ असे ॥ ११ ॥ अनेक साधनें अनेक युक्ति । अनेक प्रकारें धरूनि विरक्ति । त्यागूनियां विषयासक्ति । भगवद्भक्ति आदरिती ॥ १२ ॥ धारण करूनि नानावेष रंग । आळविती सर्वदा श्रीरंग । नित्य भजन टाळ वीणा

मृदंग । घेऊनि अभंग पठती ते ॥ १३ ॥ टाळ मृदंगादि वाद्यें फुटती । बहुवार वीण्याच्या तारा तुटती । वाद्यें वाजवितां कर दुखती । कंटाळती भजन करितां ॥ १४ ॥ भगवद्गुणानुवाद-स्मरण । हरिचर्चा इतिहास पुराण । नित्यनेमें करिती पठण श्रवण । परी तें दर्शन दुर्लभ असे ॥ १५ ॥ बैसती लावूनियां कपाट । प्राणस्पंदनिरोधनयोगें हट । करूनि म्हणती पावलों अवीट । परमानंदमोक्षासी ॥ १६ ॥ निरंतर बैसती ध्यानीं । कोणासी न बोलती मौनी । लाविती अग्नीच्या चौऱ्यायशीं धुनी । परी तें दर्शन दुर्लभ ॥ १७ ॥ एके पायावरी उभे ठाकती । अक्षयी हस्त वर ठेविती । नखें केशादिक वाढविती । टांगूनि घेती उफराटें ॥ १८ ॥ काष्ठलतेचे कटिदोर । काष्ठाचीच कौपीन बडीवार । लिंगासि लाविती कुलुप सुंदर । परंतु दुर्लभ दर्शन तें ॥ १९ ॥ लोहकंटकाची शय्या करून । त्यावरी बैसती भस्म लावून । वनस्पतीनें धातु मारून । भस्म देती लोकांसी ॥ २० ॥ ताम्रादिधातूंचें कांचन । रौप्यमुद्राही दाविती करून । जडी बुटी किमया साधून । उदरपोषण करिती ते ॥ २१ ॥ अग्नि-उदकावरी चालती । अंतरालीं उभे राहती । अष्टसिद्धींची झालिया प्राप्ति । अथवा सांगती उलगडे ॥ २२ ॥ यति ब्रह्मचारी आदिक । वैद्यक्रिया औषधी अनेक । तिरस्कारूनि परमार्थ अलौकिक । करिती संसारिक साधनें ॥ २३ ॥ टोंचूनि घेती लोखंडाचे गळ । मनकवडे जोशी सांगती फळ । कावडी भरूनि गंगाजळ । कापडी लोकां दाविती ॥ २४ ॥ ग्रामांत घालिती लोटांगण । नानाप्रकारें उपोषण । करिती ग्रंथाचें पारायण । कर्में अथवा भक्तिमार्गें ॥ २५ ॥ बहुतप्रकारचें विचित्र मत । करिती साधनें अनंत । तथापि असे या कलियुगांत । भगवद्दर्शन दुर्लभ ॥ २६ ॥ साधनें राजस तामसी । सकामनिक अत्यंत सायासीं । जन्मभरी करितां कष्टांसी । भगवद्दर्शन न होय ॥ २७ ॥ प्रत्यक्ष देवदर्शन कलियुगांत । अति दुर्लभ असे जें निश्चित । तें प्रत्यक्ष पूर्णब्रह्म क्षणांत । कमंडलुतीर्थीं प्रगटलें ॥ २८ ॥ भक्तप्रतिज्ञा-सिद्ध्यर्थ । उभे ठेले नृसिंह जगन्नाथ ।

चंचळभारतीचे मनोरथ । पूर्ण केले भगवंतें ।। २९ ।। तो परमेश्वर जरी करी कृपा । संसारपरमार्थ तरीच सोपा । होय निश्चयात्मक सहज बापा । शिष्या धरीं रे मानसीं ।। ३० ।। बहुत जन्मांचें पूर्वार्जित । ईश्वरार्पण निष्काम सुकृत । असतां निरामय धूतचित्त । तरीच परमात्मकृपा होय ।। ३१ ।। भोळे भाविक भक्तिमान । सहज मोकळें शुद्ध मन । कामरागद्वेष त्यजून । भगवच्चरण सेविती जे ।। ३२ ।। मग ते केवळ उच्च जाती । अथवा नीचकूळ असतां मंदमति । गोड लागे ती भगवद्भक्ति । अनन्य प्रेमें जयांसी ।। ३३ ।। तयांसी श्रीजगदीश्वर । सद्गुरुनाथ दयासागर । प्रसन्न होऊन निरंतर । प्रत्यक्ष दर्शन देतसे ।। ३४ ।। अंतःकरण असूनि निर्मळ । हरिगुरुचरणीं चिरकाळ । असतां अनन्यैक भक्ति केवळ । अवश्य होय दर्शन तें ।। ३५ ।। येथें मुख्य कारण शुद्ध भाव । भाव तेथेंचि देवाधिदेव । सर्वदा तिष्ठतसे स्वयमेव । निःसंशय जाणिजे ।। ३६ ।। पाषाणीं मृत्तिकेंत आणि काष्ठांत । देव नसतांही भावें पावत । तस्मात् भावचि कारण होत । प्रत्यक्ष देव-प्राप्तीतें ।। ३७ ।। 'भावेन देवं' ऐशीं शास्त्रसंमत । वचनें कल्याणकारक निश्चित । भावेंचि भेटे तो भगवंत । होय दास दासांचा ।। ३८ ।। अंतःकरणीं नसतां भाव । कैसा पावे विश्वेश्वर देव । म्हणूनि सर्वदा अवश्यमेव । शुद्ध भाव पाहिजे ।। ३९ ।। 'भावयतीति भावः' । सत्ता करितो जो तो भाव । सत्ता आत्मा चेष्टाभाव । अस्तित्वपणाची स्थिति ।। ४० ।। सहजगुण दृढ निश्चय । मनोभावादि अभिप्राय । अर्थ भावार्थ पूज्य आर्य । उपदेश मन ईश्वर ।। ४१ ।। 'भाव' शब्दाचे अर्थ बहुत । असती शब्दकोशांत । येथें दृढनिश्चयात्मक शुद्ध चित्त । हाचि भावार्थ मुख्य असे ।। ४२ ।। संसार प्रपंचीं अवश्य वित्त । अनुकूल असतां सुख होत । संसार हा धनविरहित । क्लेशकारक होतसे ।। ४३ ।। तैसें परमार्थीस्तव चित्त । सानुकूल असावें सदोदित । मग तें चित्त चैतन्यस्वरूपभूत । होय अद्वैत परब्रह्म ।। ४४ ।। श्रोत्र-त्वचा-नेत्र-जिव्हा-घ्राण । हीं पंच ज्ञानेंद्रियें शास्त्रप्रमाण । शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध जाण । हें पंच विषय शिष्या रे

॥ ४५ ॥ श्रोत्रेंद्रियाचा 'शब्द'विषय । कर्णीं शब्द ऐकणें होय । 'स्पर्श' म्हणजे घेणें हा विषय । त्वगिंद्रियाचा जाणावा
॥ ४६ ॥ पदार्थाचा आकार पाहणें । हा चक्षूचा 'रूपविषय' म्हणणें । कटु मधुरादि रस चाखणें । हा जिव्हेचा 'रसविषय'
॥ ४७ ॥ घ्राणेंद्रियानें वास घेणें । हा 'गंधविषय' घ्राणाचा म्हणणें । पंचविषय याप्रमाणें । इंद्रियद्वारें वर्तती
॥ ४८ ॥ वाचा-हस्त-गुदा-उपस्थ-पाद । हीं पंचकर्मेंद्रियांचीं नामें विशद । वचन-दान-गमन-विसर्ग-आनंद । कर्में
असतीं हीं तयांचीं ॥ ४९ ॥ पंचभूत सूक्ष्म तन्मात्रायुक्त । 'तन्मात्रा' हे पंचविषय म्हणिजेत । पंचविषय जड दृश्य असत् ।
देहाभिमानसहित ते ॥ ५० ॥ कल्पित जड दृश्य असूनि बाधक । जैसे कुरंगासी शब्दविषय घातक । मातंगासी स्पर्श,
पतंगासी नाशक । रूपविषय होतसे ॥ ५१ ॥ रसविषय बाधक मीमासी । गंधविषय घातक भृंगासी । ऐसे प्राणनाशक
एकेकासी । विषय जाणा होताति ॥ ५२ ॥ ते पांचही विषय मनुष्यशरीरीं । नांदती महत्क्लेशकारी । या विषयांचें
ध्यान सर्वोपरी । अनर्थकारक निश्चयें ॥ ५३ ॥ या विषयांचें चिंतनरहित । जेव्हां होईल हें चित्त । तेव्हां तें चैतन्य-
स्वरूप निश्चित । चिच्छब्दें जाहलें जाणावें ॥ ५४ ॥ जड विषय 'चित्त' चिंतन तकार- । रहित होतां 'चिद्रूप' निर्विकार ।
जपा-( जास्वंदी )पुष्परंगाकार । होय जैसा स्फटिकमणि ॥ ५५ ॥ ते जपापुष्पोपाधि काढितां । पूर्वरूप
स्वच्छ मणि दिसे तत्त्वतां । तैसें चित्तजडत्व हरपतां । चिदात्मरूप उरतसे ॥ ५६ ॥ टाकूनि वृत्ति चंचल ।
अभ्यास-वैराग्यें चित्त निश्चळ । करून पावावें सुखें निर्मळ । अखंड मोक्ष-स्वरूपासी ॥ ५७ ॥ चंचळभारतीच्या मस्तकीं
प्रसन्न । वरदहस्त समर्थें ठेविल्यापासून । तयासि उपजलें ज्ञानविज्ञान । श्रीगुरुप्रसादें तात्काळ ॥ ५८ ॥ चंचळभारतीची
परमार्थस्थिति । दिवसेंदिवस वृद्धीस पावे ती । श्रीसद्गुरुकृपा होय जयावरती । तयासि काय उणें असे ॥ ५९ ॥ असो
त्या साधुवृंदें तेव्हां प्रत्यक्ष । पूर्णब्रह्म परमेश्वर निरपेक्ष । श्रीमद्दत्तात्रेयस्वामी कमलाक्ष । पाहिले लक्षपूर्वक ॥ ६० ॥

गिरिनारमूर्ति परम मंगळ । श्रीगुरुदेवदत्त स्वामी दयाळ। देखूनि धांवले साधु सकळ । होऊनि विमलचित्त ते ॥ ६१ ॥ कोमल सुंदर चरणकमल । प्रेमें आलिंगिती ते अखिल । पत्र-पुष्प-धूप-दीपयुक्त फल । करिती मांगलिक आरती ॥ ६२ ॥ शरणागत भावें अनन्य । तटस्थ उभे जोडूनि करद्वय । सुदुर्लभ दर्शनें साधु निरामय । भयरहित झाले ते ॥ ६३ ॥ प्रार्थना करिती भक्त सेवक । अन्यजन प्रेमळ भाविक । अभिमानरहित होऊनि लोक । जगन्नायका आळविती ॥ ६४ ॥ जयजया जी अनसूयानंदन । मूलाधार जगज्जीवन । भक्तवत्सल प्रसन्न वदन । त्रिभुवनानंदन व्यापका ॥ ६५ ॥ पूर्णब्रह्म लीलावतारी । दत्तात्रेय श्रीपाद नरहरि । जगदुद्धारक श्रीगिरिनारी । आम्हांवरीं वळले हो ॥ ६६ ॥ जे न होय कदापि ब्रह्मादिकां । ते अद्भुत लीला दावितां लोकां । अतुल सामर्थ्य विश्वव्यापका । आपणांसचि शोभतसे ॥ ६७ ॥ दुजा कोण या चतुर्दश । ब्रह्मांडीं समर्थ परमेश । विधाता सदाशिव हृषीकेश । त्रयमूर्ति आपण प्रत्यक्ष ॥ ६८ ॥ अनंतकोटि ब्रह्मांडनायक । उत्पत्ति-स्थिति-संहारक । कलियुगामाजीं अलौकिक । प्रत्यक्ष नेत्रीं देखिले ॥ ६९ ॥ 'चक्षुर्वैसत्यं' ऐशी श्रुति । आम्हांसि प्रत्यक्ष फलप्रदाती । स्वानुभवा आली हो निश्चितीं । भगवन्मूर्ति विलोकिली ॥ ७० ॥ अगाध पूर्वपुण्य फला आलें । अनंतजन्मीं जें न देखिलें । तें परमात्मस्वरूप प्रत्यक्ष ठेलें । मूर्तिमंत समोर ॥ ७१ ॥ जी परब्रह्ममूर्ति सदैव । आम्हांसि भेटलीं स्वयमेव । जी अंतर्बाह्य पूर्ण सदैव । विश्वव्यास असे जी ॥ ७२ ॥ हृदयांतरीं वसूनि सदोदित । वदवी जी निःसंशय लीलामृत । कमंडलुतीर्थी प्रतिष्ठित । भक्तमनोरथपूरक जी ॥ ७३ ॥ रामदास आणि कृष्णदास । विगलिताहंकार मानस । होऊनि शरण प्रभुपदास । वारंवार नमिती ते ॥ ७४ ॥ कृष्णगिरी भारतीबुवा । रामपुरी खाकीबुवा । अवघडदास अघोरीबुवा । दत्तदर्शनें कृतार्थ झाले ॥ ७५ ॥ जें जें अंतःकरणीं आणिती । अंतःसाक्षी नृसिंहसरस्वती । तें तें प्रत्युत्तर समाधानवृत्ति । व्हावया देती गुरुवर्य ॥ ७६ ॥ चरणदास साधु

नाम । त्याचे अंतरीं संशयागम । चित्तनिग्रह असे बहुत विषम । कैसा साध्य होईल ॥ ७७ ॥ हठनिग्रह योग-साधनास । फारचि होताति आयास । तथापि तेही करूनि शेवटास । मोक्षप्राप्तीचा संदेह उरे ॥ ७८ ॥ कोण्या साधनें चित्तजय । आत्मज्ञानप्राप्त्यर्थ त्वरें होय । तो कळावा मजला उपाय । ऐसा संशय चरणदासाचा ॥ ७९ ॥ चरणदास मनाचा संदेह । विषम असे चित्तनिग्रह । जाणूनि स्वामीनृसिंह । दत्तात्रेय अवधूत ॥ ८० ॥ चंचलभारतीसी आज्ञापिती । शास्त्रविहित शंकानिवृत्ति । करावी त्वां धरूनि शान्ति । आज्ञानुसार वर्तावें ॥ ८१ ॥ मग चंचलभारती उठोन । समर्थांसी करूनि साष्टांगनमन । सद्गुरुआज्ञा शिरीं मानून । भाषण करिता जाहला ॥ ८२ ॥ हें मन चंचल प्रमाथी दृढ बलवान् । याचें सुदुष्कर संयमन । वायूचें जैसें आकलन । तैसा कठिण मनोजय ॥ ८३ ॥ समुद्र करवेल प्राशन । सुमेरूतें टाकवेल उपटोन । होईल वन्हीचेंही भक्षण । परी मनोनिग्रह कठिण महा ॥ ८४ ॥ मनोवेगवृत्ति अनिवार । म्हणोनि मनोनिग्रह विषम दुष्कर । तथापि तो निश्चयें सत्वर । अभ्यास-वैराग्येंच होतसे ॥ ८५ ॥ मनोनिग्रहाचे दोन प्रकार । वेदांतीं वर्णिले यथाशास्त्र । एक 'हठनिग्रह' प्रथम प्रकार । 'क्रमनिग्रह' दुजा असे ॥ ८६ ॥ चक्षुश्रोत्रादि पंचज्ञानेंद्रियें । वाक्पाणि आदिक पंचकर्मेंद्रियें । याप्रकारें दशेंद्रियें । सर्व शरीरीं असती हीं ॥ ८७ ॥ अहो हीं दशेंद्रियें जैशीं । तत्तद्गोलकमात्राचे निरोधवशी । हठनिग्रहें हीं जाणा अपैशीं । निग्रह केलीं जातीं ॥ ८८ ॥ तैसेंच या चंचलमनाचा । हठनियोगें निग्रह करूं साचा । जडमूढ पुरुषासी या प्रकारचा । श्रमचि केवळ होतसे ॥ ८९ ॥ परंतु त्या दशेंद्रियांसारखा । मनोनिग्रह हठमात्रें जरी लेखा । तथापि कदाकाळीं न होय देखा । चित्तजय हठनिग्रहें ॥ ९० ॥ मनोनिग्रह हठमात्रें कां न होय । ऐसा येईल जरी संशय । तयांचें समाधान सांगूं प्रत्यय । शास्त्रविहित परिसावें ॥ ९१ ॥ त्या मनाचें वास्तव्यस्थान गोलक । जें हृदयकमल असे सम्यक् । तें निरोध करण्यास अशक्य । हृदयकमल सर्वथा ॥ ९२ ॥

संत हो-याकरितां तो मनोजय । व्हावयासी योग्य उपाय । क्रमनिग्रहचि योग्य होय । हेंचि सांगती वशिष्ठऋषि ॥ ९३ ॥ चित्ताच्या स्वभावासी जाणणार । पुरुष असती जे चतुर । उत्तम युक्तिवांचूनि वारंवार । हठयोग त्यांनीं सेवूं नये ॥ ९४ ॥ आसनावरी होऊनि स्थित । म्हणती कोणी मनोजय करूं त्वरित । हठयोगें करूं चित्त विजित । परी हें न घडे कदापि ॥ ९५ ॥ जैसे दुष्ट मतंगज महामत्त । अंकुशाविना वश न होत । तैसें उत्तमयुक्तिवांचून चित्त । वश न होय सहसाही ॥ ९६ ॥ परिसा त्या युक्तिचतुष्टय उत्तम । प्रथम 'अध्यात्मविद्याधिगम'। दुसरी 'महात्माजनांचा समागम'। अवश्य व्हावा सर्वदा ॥ ९७ ॥ तिसरी 'वासनांचा परित्याग'। चवथी 'प्राणस्पंदनिरोधयोग'। ह्या चारी युक्तिरूप उपाय सांग । चित्तजयासी असती हो ॥ ९८ ॥ ऐशा चारी युक्ति शक्तिमंत । विद्यमान् असतांही उक्त । जे पुरुष हठयोगें चित्त । निग्रह करिती व्यर्थचि ॥ ९९ ॥ त्या पुरुषांसी केवढें अज्ञान । दीपाचा परित्याग करून । ते अंजनाच्या योगें जाण । तमासी निवृत्त करिताति ॥ १०० ॥ दीप त्यागूनि हठमार्गें काजळें । अंधःकार घालवूं म्हणती बळें । ते अति मूढ दुराग्रही आंधळे । बंधन पावती संतत ॥ १ ॥ जेवीं मदोन्मत्त हस्ती । कमलतंतूनें बांधिती । मनोनिग्रह हठें त्या रीतीं । करिती वृथैव ॥ २ ॥ तस्मात् व्हावयासी मनोजय । क्रमनिग्रहचि असे योग्य । अध्यात्मविद्याप्राप्ति-उपाय । मुख्यत्वें होय क्रमैक ॥ ३ ॥ ते अध्यात्मविद्या कैशी संतत । कळवूनि जनांसी नित्य बोधित । कीं प्रपंच जड दृश्य मिथ्याकल्पित । नाशवंत असे अविद्येसह ॥ ४ ॥ या मिथ्यादेहपंचादिविरहित । द्रष्टा साक्षी आत्मा सदोदित । स्वप्रकाश परमानंदरूप नित्य । अंतर्यामीं वसतसे ॥ ५ ॥ अजरामर परमार्थस्वरूप । हृदयस्थ जो अत्यंत समीप । प्रत्यगात्मा परब्रह्म निर्विकल्प । तोचि प्रत्यक्ष आपण आहों ॥ ६ ॥ हाचि क्रमनिग्रह प्रथम मुख्य । परमात्माप्राप्तीस सोपा उपाय । या क्रमें सहज होत मनोजय । ऐसें ब्रह्मविद्या बोधितसे ॥ ७ ॥ ऐसा प्रबोध झालियानंतर । स्वविषयभूत दृश्यपदार्थ गोचर । त्याविषयीं हें मन चतुर ।

मिथ्यत्वहेतुत्वें जाणतसे ॥ ८ ॥ आपले गोचर दृश्यविषयाच्याठायीं । हें मन मिथ्यत्वहेतूनें पाहीं । प्रयोजनाच्या अभावासही । मन हें निश्चित करितसे ॥ ९ ॥ यथा प्रयोजनयुक्त । परमार्थ परमानंदस्वरूप सत्य । अविद्यामायेहूनि भिन्न अत्यंत । गुणातीत परात्पर असे ॥ ११० ॥ त्याविषयीं स्वप्रकाशतारूप हेतूला । जाणूनि आपले अविषयतेला । अध्यात्मबोधें निश्चय केला । निर्विषय मनानें शांतिप्रद ॥ ११ ॥ जैसा अग्नि इंधनरहित । आपोआप होतसे शांत । तैसें निर्विषयरूप चित्त । उपरमाप्रत पावतें ॥ १२ ॥ म्हणूनि अध्यात्मविद्या प्राप्त । झाल्यानें कष्टायासरहित । मनोनिग्रह सुखेनैव होत । ज्ञानरूप उपायें ॥ १३ ॥ आणि ऐशा बोध केलेल्या तत्त्वासी । जाणूं न शके जो आळशी । अथवा जाणलेल्या तत्त्वबोधासी । वारंवार विस्मरे जो ॥ १४ ॥ ऐशा भिन्न दोघांसी मनोजय । व्हावया 'साधुसमागम' उपाय । केलाचि पाहिजे अगत्य । अवश्यमेव सत्संग ॥ १५ ॥ या दोन्ही अधिकाऱ्यांप्रति । महात्माजन पुनः पुनः बोधिती । वारंवार ते तत्त्वबोधाची स्मृति । करविती कृपाळु अध्ययन ॥ १६ ॥ आणि जे विद्या-धन-मदादिक । दुर्वासनेनें पीडित असम्यक् । महात्मा साधुसंग क्षण एक । करूं न शकती कदा जे ॥ १७ ॥ त्या पुरुषांसी पूर्वोक्तविचारें । मनोनिग्रहासी उपाय वा रे । 'वासनापरित्याग'चि खरें । साधन तिसरें योग्य असे ॥ १८ ॥ आणि वासनेच्या अतिप्रबलता । योगें पावले जे नर दीनता । वासनात्यागार्थ असामर्थ्यता । जाहली असे जयांसी ॥ १९ ॥ तयांसी 'प्राणस्पंद-निरोधन'। चित्तनिग्रहार्थ उपाय साधन । कां तरी वासना तथा प्राणरोधन । चित्तप्रेरक असती हो ॥ १२० ॥ अतिकठिण तिन्ही उपाय । ज्यांना वाटती कष्टमय । तयांसी प्राणरोधन चतुर्थोपाय । सांगती वशिष्ठ ब्रह्मर्षि ॥ २१ ॥ रामचंद्रासी वशिष्ठ सांगती । चित्तवृक्षाचीं दोन बीजें असती । एक प्राणस्पंदनिरोध म्हणती । वासनात्याग दुसरें तें ॥ २२ ॥ या दोन बीजांतील एकाचा । नाश झाला असतां साचा । तरी शीघ्र दुसऱ्या बीजाचा ।

नाश स्पष्ट होतसे ॥ २३ ॥ आतां प्राणायामाभ्यासें दृढ । सद्गुरूनें दाविली जी युक्ति सुघड । आसनभोजनादिकांचे नियमें गाढ । प्राणस्पंद-निरोध होतसे ॥ २४ ॥ आणि असंग व्यवहार राखितां । प्रपंचचिंतन परित्यागितां । हें शरीर नाशिवंत मिथ्या देखतां । वासना निवृत्त होतसे ॥ २५ ॥ संसार प्रपंचाचें अचिंतन । निःसंग-निर्मोहत्वें व्यवहारीं वर्तन । देह दृश्य जाणलिया नाशवान् । तदा वासना नुपजेचि ॥ २६ ॥ वासनेच्या परित्यागें खचित । तैसेंच प्राणस्पंद-निरोधें चित्त । अचित्तभावासी होय प्राप्त । यावरी यथेच्छित तें करीं ॥ २७ ॥ बाह्य अनात्म-पदार्थांचें रघुनंदन । जें वस्तुत्व-स्वरूपें भावन । तैसेंचि सानुरागेंकरून । अंतरीं चिंतन पदार्थांचें ॥ २८ ॥ रघुतिलका एवढेंचि मात्र । चित्ताचें स्वरूप यथाशास्त्र । अनात्म-विषयानुचिंतन अत्र । सत्य जाण मानितों मी ॥ २९ ॥ ज्या कालीं हा पुरुष आणिक । परित्यागासी पदार्थ योग्य अमुक । किंवा ग्रहण करण्यास योग्य एक । 'वस्तुचिंतन' ऐसें तें ॥ १३० ॥ तें त्याग-ग्रहण दोन्ही टाकून । किंचितूवस्तूचें देखील चिंतन । बाह्य अनात्म-पदार्थांचें भावन । क्षणमात्रही करूं न शके ॥ ३१ ॥ किंतु सर्वांचा परित्याग करून । स्थित होतां अचिंतन । त्या कालीं चित्तोत्सर्जन । होत नाहीं सहसाही ॥ ३२ ॥ आणखी ज्या कालीं हें मन । सर्व वासनारहित होऊन । करित नसे लेश मनन । दृश्यादृश्यही वस्तूंचें ॥ ३३ ॥ त्या कालामाजीं 'अमनस्ता' । म्हणजे मनोविकारशून्यता । उद्भवते ते कैशी आहे अमनस्ता । परमात्मपददायक ॥ ३४ ॥ इतुक्या कथनें दोन उपाय । सिद्ध झाले अभ्यास-वैराग्य । प्राणस्पंद-निरोधार्थ योग्य । अभ्यासरूप उपाय असे ॥ ३५ ॥ वासनापरित्यागार्थ दुसरा । वैराग्यरूप उपाय बरा । 'अध्यात्मविद्या-साधुसंग' खरा । ऐसे हे उपायद्वय ॥ ३६ ॥ परंतु हे दोन उपाय सम्यक् । अभ्यासवैराग्याचे उपपादक । आहेत म्हणून अंतर्भूत निःशंक । अभ्यासवैराग्यामाजीं अमती ॥ ३७ ॥ अतएव अभ्यासवैराग्ययुक्त । कथिलें हें जें शास्त्रविहित । तैसें वर्तावें हो साधु

संत महंत । भावें नित्य नियमानें ॥ ३८ ॥ चित्तवृत्तीचा निरोध योग । प्राणायामादि यथासांग । पुढें प्रसंगीं हठयोग राजयोग । होईल निरूपण यथामति ॥ ३९ ॥ या कलियुगीं हठयोगक्रिया । महाकष्टें सिद्ध व्हावया । कठिण असे, परी बोलावया । सोपें सहज वाटतसे ॥ १४० ॥ योगानुभवी सद्गुरु कुशल । योगमार्ग-प्रदर्शक जरी मिळेल । तरीच योगयोगांग साधेल । निःसंशय जाणावें ॥ ४१ ॥ साधिलें जरी हठनिग्रह-पक्षा । तथापि राजयोगाची उरेल अपेक्षा । कां तरी आत्मज्ञानावीण मोक्षा । पावेल कैसा अधिकारी ॥ ४२ ॥ हठनिग्रहाची आवडी । तेणें करूनियां तांतडी । बंद करावी सुखें नाकपुडी । वायु कोंडूनि टाकावा ॥ ४३ ॥ हठनिग्रहीं बहुत आयास । क्रमनिग्रहचि यापरिस । वाखाणिती श्रेष्ठ ब्रह्मविद्यावतंस । मोक्षासि सुलभ राजयोग ॥ ४४ ॥ स्ववर्णाश्रम निष्कामकर्म धवल । करितां ईश्वर-प्रणिधान सर्वकाल । परमेश्वरासी शरण गेल्या निर्मल । मनोजय सहज होतसे ॥ ४५ ॥ ईश्वरानुग्रहावांचून । तथा संत-गुरूच्या सेवेवीण । कदा न होय योगसाधन । वेदान्तविज्ञान सुनिश्चित ॥ ४६ ॥ चंचळभारतीच्या मुखें श्रवण । करूनि तोषले साधुजन । म्हणती धन्य गुरुकृपा सघन । भारतीसी ज्ञान जाहलें ॥ ४७ ॥ ऐसा परमानंद-रसस्वाद । चाखित असतां साधुवृंद । श्रीगिरिनारी सच्चिदानंद । दिसेनासे जाहले ॥ ४८ ॥ टकमकां पहाती सकळिक । कोठें गेले योगींद्रतिलक । नृसिंहगुरु यतिनायक । शोधिती लोक पर्वतीं ॥ ४९ ॥ पंचम शिखरावरती । दत्तात्रेय-चरणपादुका असती । तेथें जाऊनि जन पाहती । तंव नृसिंहमूर्ति विलोकिली ॥ १५० ॥ साधुवृंद झाले अनन्य शरण । दृढ धरती दत्तात्रेयचरण । म्हणती स्वामी समर्थ आपण । आमचा सांभाळ करावा ॥ ५१ ॥ श्रीचरणाचा कदा वियोग । न साहवे आम्हांसी क्षणमात्र वेग । भक्तजनपालक अव्यंग । फेडा पांग दीनांचा ॥ ५२ ॥ ऐकूनि वचन देती स्वामी । सदासर्वदा अंतर्यामीं । अंतर्बाह्य असून स्मरणगामी । तिष्ठत आहों संत हो ॥ ५३ ॥

आशीर्वचन मंगलकारक । ऐकून संतुष्टले संत सेवक । पूजूनि सद्गुरूसि सकळिक । प्रेमें आरती ओंवाळिती ॥ ५४ ॥
पुष्पवृष्टि करिती अमर । एकरूप गाजला जयजयकार । अद्वितीय ब्रह्मानंदसागर । उचंबळला सर्वत्र ॥ ५५ ॥
तेचि कथा पुढिले अध्यायांत । स्वयें वर्णवील गुरुदेवदत्त । श्रोतीं होऊनि सावधचित्त । श्रवण करावी अत्यादरें ॥ ५६ ॥
स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । त्रयोदशोध्याय गोड हा ॥ १५७ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे त्रयोदशोऽध्यायः समाप्तः ॥ १३ ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥

